Vol 4 Issue 11 May 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Dr. T. Manichander

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Golden Research Thoughts
ISSN 2231-5063 Impact Factor :3.4052(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | May - 2015 Available online at www.aygrt.isrj.org

बिराड : भटक्या जमातीचे वास्तव जीवनचित्रण

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलडाणा.

Short Profile

Professor dr. Savita Madhavrao Pawar is working in arts and science women college, Mehkar, District : Buldhana.

प्रस्तावना :

'बिराड' या अशोक पवार यांच्या आत्मकथनाने बेलदार समाज जो पशुतुल्य जीवन जगत आला आहे, त्याचे जिवंत आणि वास्तवदर्शी चित्र जगासमोर आणण्याचे काम केले आहे. बेलदार समाज हा भटका, गावाबाहेर पालावर राहणारा. गावोगावी चिरे फोडणे, भिंती रचणे, विहिरी खोदणे अशी कामे करुन हा समाज आपला उदरनिर्वाह करतो. प्रसंगी भीक मागावी लागते. कधी कापूस चोरणे, शेतातील कणसं कापून नेणे, कोंबडया चोरणे अशा चोऱ्याही पोटासाठी त्यांना कराव्या लागतात. गावोगावी भटकत असताना पारधी, कैकाडी, वासुदेव, लमाणी या फिरस्ती समाजाशीही त्यांचा संबंध येतो. या समाजाचेही ओघाने चित्रण या आत्मकथनातून आले आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढीपरंपरांच्या विळख्यात अतिशय विपन्नावस्थेत हा समाज वर्षानुवर्षे जगत आला आहे. आज इथे तर उद्या तेथे असे अस्थिर जीवन असल्यामुळे मुलाबाळांना शिक्षण देणेही त्यांना शक्य नाही आणि तसेही दारिद्रयामुळे मुलांना शाळेमध्ये टाकणे त्यांना परवडणारे नाही. रहिवाशी असल्याचा दाखला नसल्यामुळेही त्यांना शाळेत प्रवेश मिळत नाही. आजारपणात वैद्य, डॉक्टर त्यांना माहित नाही. नवससायास कोंबडया, बकऱ्यांचा बळी देऊन, अंगाराधुपाऱ्याने आजार बरा होतो असा या लोकांचा समज. प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होत आलेले आहेत. चोर असल्याचा शिक्काच या भटक्या लोकांवर बसलेला आहे. त्यामुळे गावकऱ्यांकडून, पोलिसांकडून या समाजावर सतत अन्यायझालेला दिसतो, मारहाण झालेली दिसते. अशा मारहाणीत प्रसंगी जीवही गेलेले दिसतात. स्त्रियांवर झालेले अन्याय, अत्याचार तर भयावह आहेत. जातपंचायत या समाजावर प्रभाव टाकताना दिसते. प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडू इच्छिणाऱ्यांना ही जातपंचायत मागे खेचते. पैशाच्या जोरावर न्याय विकला जातो आणि त्यातून कित्येक या

जातपंचायतीचे बळी ठरतात. स्वतंत्र भारतात भटके जीवन जगणाऱ्या आणि न्याय हक्कांपासून वंचित असलेल्या बेलदार समाजाच्या वस्तुस्थितीपूर्ण चित्रणातून त्यांचे रीतीरिवाज, परंपरा, अज्ञान, अंधश्रध्दा, त्यांच्या धारणा, प्रस्थापित समाजाकडून त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार आणि या माध्यमातून एकंदर त्यांच्या जीवनदर्शनाचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

अज्ञान, अंधश्रध्दांचे प्राबल्य :

बेलदार समाज शिक्षणाच्या अभावामुळे अंधश्रध्देच्या आहारी गेलेला दिसतो. अंगात येणे, नवस बोलणे यासारख्या गोष्टी त्यांच्या जीवनाचा महत्वाचा भाग राहिलेल्या दिसतात. बिराड आत्मकथनातील सोजी ही मुलगी, वयाने खूप लहान. अंगावर गरम चहा पडून भाजते. मरणासन्न अवस्थेत ती असताना अंगारेधुपारे केले जातात. डॉक्टर, वैद्य या लोकांना माहित नाही. उपचाराअभावी या मुलीचा मृत्यू होतो. पुष्कळदा अंगात येत नसेल तर पाणी अंगावर ओतून प्रयत्नपूर्वक अंगात आणले जाते. आश्रूबाला म्हणजे अशोक पवार यांना एकदा ताप येतो तेव्हा बुढयाच्या अंगात येण्यासाठी त्याच्या अंगावर पाणी ओततात. अंगामध्ये देव येऊन तो आजार कशामुळे आला हे सांगतो, त्याचबरोबर काही उतारा सांगतो असा या लोकांचा समज. अंगात देव आलेला बुढा म्हणतो, ''आरे देवा. हयाला शिवंवरला पिऱ्या वडर लागला. मातीवरला दगुड ह्यानं उचलून गाढवाला हानला. हे झाड तुमच्या हातचं न्हव्हतं. पिऱ्या वडर ह्याला घिऊन जात व्हता. पर तुमच्यासंग भगत आन् देवाचं ठाणं हाय म्हणून वाचला. ..... ह्याला एक कोंबडं लागते. रातच्या बाराला कोंबडं कापा. देवाला निवंद दावा, ह्या पोरावुन ईस लिंबू उतरते कापा. मग एक सागुतीचं खांड आन् रोटी ह्या पोरावून तीनदा उतरवा आन् मग लांब न्या. नेत असताना म्हागं वळून पाहू नका. आन् तसंच फेका. मग म्हागं वळा.''१कोणताही औषधी उपचार न करता देवाला कोंबडे, बकरे कापणे, लिंबू कापणे ह्या गोष्टी श्रध्देने हा समाज करत आलेला दिसतो. कान्हू सतीमाता हे बेलदारांचे कुलदैवत. तिला मलिद्याचा नैवेद्य दिला की ती संकटाचे निवारण करते. तिच्या आशीर्वादाने काम मिळते अशीही श्रध्दा या समाजामध्ये दिसते. कान्हू सतीमातेची जी कहाणी सांगितली जाते त्यामध्येही कुष्ठरोग झालेल्या तिच्या नवऱ्याला अंगारेधुपारे, भगताकडून उपचार केले जातात. दारु पिऊन धिंगाणा घालणे, मारहाण करणे यासारखे प्रकार तर नित्याचेच असल्यासारखे आहेत, मग ते जातपंचायतीमधील न्यायनिवाडे असो वा सणउत्सव असो, लग्नाचा प्रसंग असो.

आसरा आणि म्हसोबा यांनाही बेलदार समाज भजताना दिसतो. त्यांची अवकृपा झाली की ते धरतात त्यामुळे आजारपण येते. आजार बरा होण्यासाठी म्हसोबा, आसरांना नवस बोलला जातो, नैवेद्य दाखवला जातो. पारधी समाजातही मरीमाय, काळखामाय, पोचामाय अशी दैवतांची नावे दिसतात. मरीमायला नवस म्हणून रेडा कापला जातो. अतिशय निर्दयपणे रेड्याला मारले जाते. बेलदार समाज वाघाचे मांस खातो. वाघाचे मांस खाल्ल्याने माणूस वाघासारखा होतो, असाही समज आहे. परिस्थितीमुळे सडलेली शेळीसुध्दा खाण्याची पाळी या लोकांवर येते. त्यांच्या अज्ञानाचा फायदा गाववाले, पोलीस घेताना दिसतात. जटाळ्या भगत हा आपल्याला जादू येते असे भय दाखवून लोकांच्या जीवावर जगतो. लोक त्याला घाबरतात आणि फुकट पोसतात. गाववाले त्यांच्याकडून पैसे लुबाडतात, कोंबडे मागतात. त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेतात. पोलिसांच्या मारहाणीत धोंड्या मरतो, तेव्हा पोलिस कोऱ्या कागदावर सरीमामीचा अंगठा घेतात आणि स्वतःचा बचाव करतात. चोरीच्या केवळ संशयावरून भटक्या समाजावर अत्याचार होत आलेले आहेत. सोने चोरल्याच्या संशयावरून पुरुषांनाच नाही तर स्त्रियांनाही पोलिस ठाण्यात ठेवले जाऊन मारहाण होते. स्त्रियांचे शारीरिक शोषणही पोलिसांकडून होते. यंकातात्याची बायको याचे उदाहरण आहे. पोलिसांविषयी भय या लोकांच्या मनात राहत आलेले आहे. त्यामुळे भटका समाज वचकून असतो. त्यांच्या भटकेपणाचा, अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होत राहतात. त्यांचे शोषण होत राहते.

भटकेपण कायम सोबतीला असल्यामुळे मुलांना शिक्षण देण्यात अनेक अडचणी या समाजालायेतात. बेलदार, पारधी, वासुदेव आदी समाजामध्ये शिक्षणाचे महत्व हळूहळू पटू लागलेले आहे. तरी भटकेपणामुळे आणि दारिद्र्यामुळे मुलांना शिक्षण देणे शक्य होत नाही. शाळेत नाव दाखल करून घेण्यासाठी शंभर रुपये देऊन वर जेवणाची सोय अशोकला करावी लागते. बोर्डिंगमध्ये जेवणाची व्यवस्था नीट नसते. तिथेही भ्रष्टपणा आढळतो.

त्याविरुध्द बोलण्याची सोय नाही. बोलून तक्रार केल्यामुळे अशोकला बोर्डिंगातून काढले जाते. पुस्तकांची, कपड्यांची व्यवस्था नाही, गरिबीमुळे ते शक्य होत नाही. अशावेळी पुस्तकाची चोरी करण्याची वेळ अशोकवर येते. नरडे विकून कपड्यांची सोय करावी लागते. अशा विपरित परिस्थितीत काही चांगले अनुभवही येतात. काही शिक्षकांची अशोकला मदतझालेली आहे. पारधी समाजातही अज्ञानामुळे अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात दिसतात. एका स्त्रीला तिच पावित्र्य सिध्द करण्यासाठी उकळत्या तेलातून टाकलेला रुपया काढावा लागतो. तिने जर तो काढला तर ती स्त्री पवित्र., अन्यथा तिला अपवित्र म्हणून शिक्षा भोगावी लागणार. ही एक भयंकर शिक्षा आहे हे कोणाला जाणवत नाही. पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या अंधश्रध्दा, समज यांचा पगडा या भटक्या समाजावर दिसतो. त्या मगरमिठीतून हा समाज बाहेर पडायला तयार नाही.

प्रस्थापित समाजाकडून मिळणारी वागणूक :

'बिराड' हे अशोक पवार यांचे आत्मकथन असले तरी त्यामध्ये आलेल्या प्रत्येक व्यक्तिरेखेची स्वतःची एक कहाणी आहे. स्वतःचे उद्ध्वस्त आयुष्य आहे. लक्ष्मण, बुढा, बुढी, नाना, पारीमामी, बंडूमामा, धोंडूमामा, सरीमामी, यशोदा, संपत, पांड्या, शांती, हरणी, रकमी, गऊ, मंडोदरी, जना ह्या साऱ्या व्यक्तिरेखा एका चक्रव्युहात सापडल्याप्रमाणे गावाबाहेर पालावर भटके जीवन जगताना दिसतात. मरणयातना सोसत आपल्या वाटयाला आलेले बकालपण स्वीकारून पुढे जात राहतात. भटक्यांचे अवघे जीवनच त्यांच्या रुपाने जगासमोर आले आहे. भटक्या समाजाच्या जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने 'बिराड' एक दस्तावेज आहे, असे म्हणता येईल.

प्रस्तुत आत्मकथनामध्ये आलेला बेलदार समाज हा दगड फोडण्याचे , चिरे वाहण्याचे काम करतो. प्रसंगी ऊसतोडीचे कामही स्वीकारतो परंतु कामाचे पैसे वेळेवर त्याला मिळत नाही. जी काही मजुरी मिळते त्यातून उदरनिर्वाह होत नाही. भूकेची गरज भागत नाही. अशावेळी भीक मागून पोट भरावे लागते. गावात दारोदार भीक मागताना स्त्रियांना गावकऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक मिळते. या स्त्रियांच्या वस्त्रांना हात घालण्याची हिंमत गावगुंड करतात आणि अशा अपमानास्पद वागणुकीबद्दल अवाक्षरही बोलता येत नाही. आपल्या स्त्रियांना गावगुंडाच्या नजरेपासून वाचवण्याचा प्रयत्न पुरुषांचा आहे. पण त्यांना विरोधही करता येत नाही. सरपंच, पाटील, कोतवाल, पोलीस यांच्याकडून या समाजावर अनेक तऱ्हांनी अन्याय, अत्याचार झालेले आहेत. बिराडमधून असे पशुवत अत्याचार समोर येतात. प्रस्थापित समाजाचा भटक्या समाजातील स्त्रियांकडे पाहण्याचा दुषित दृष्टिकोन आहे, त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांचे शोषण केले जाते. सरीमामी, पारीमामी, भोयाची शांती, यंकातात्याची बायको आदी स्त्रिया स्वतःला प्रतिष्ठित समजणाऱ्या समाजाच्या, ज्यांच्यावर संरक्षणाची जबाबदारी आहे अशा पोलिसांच्या अत्याचाराला बळी आहेत.

गावावर या लोकांचा हक्क नाही. ते गावात राहू शकत नाहीत. गावाबाहेर राहण्यासाठीही परवाना लागतो. तीन दिवसांच्या वर त्यांना एका ठिकाणी राहता येत नाही. अस्थिर जीवनामुळे त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ऊनवाऱ्यात, पाण्यापावसात त्यांना पालावर उघडयावर जगावे लागते. प्रसंगी गाववाल्यांकडून माणुसकीही दाखविली जात नाही. मुसळधार पावसामुळे गावात देवळाच्या आश्रयाला आलेल्या अशोकच्या परिवाराला पुजाऱ्याकडून केवळ अपमानास्पद वागणूक मिळत नाही तर माणुसकीहीन कृत्य घडते. बाळांतीन स्त्रीचा देवाला विटाळ होतो म्हणून गाववाले आणि पुजारी त्यांना भरपावसात देवळाबाहेर घालवतात. रात्रीच्या अंधारात पारीमामी आपल्या लहान बाळाला गमावून बसते. नशिबाला दोष देऊन गप्प राहण्याशिवाय गत्यंतर नसते. ''आग पारी रडू नगं. ह्यो पाऊस वैरी व्होऊन आलाय. झांल गेलं ईसरुन जावा. पारी नसीबात ह वे चूक नाही.''२अशा शब्दात पारीमामीची समजूत काढली जाते. त्यांच्या वेदनांची कल्पना प्रस्थापित समाजव्यवस्थेला येत नाही. भिकारी म्हणून त्यांची संभावना केली जाते आणि अशांच्या वाट्याला असे अभावाचे जिणे येणार हे गृहित धरले जाते. 'आपली जात भिकारी' म्हणून या लोकांनीही प्राप्त परिस्थिती स्वीकारलेली दिसते. मेल्यानंतर पुरायला साडेतीन हातांची जागाही त्यांना मिळत नाही. सोजीचा अपघाती मृत्यू होतो. त्याचे दुःख असताना गावकरी तिचे पुरलेले प्रेत उकरुन काढायला लावतात. दुसऱ्या ठिकाणी पुन्हा दफन केले जाते. प्रेताची सुध्दा क्रुर चेष्टा व्यवस्थेकडून घडते. या व्यवस्थेकडून धोंड्यामामाचा बळी घेतला जातो आणि

निर्ढावलेपणाने प्रेत सरीमामीच्या सुपूर्त केले जाते. परिस्थितीमुळे प्रेताला मुठमाती देऊन झालेला अन्याय सोसावा लागतो. या समाजाची सहनशीलता ही अंतःकरण भेदून टाकणारी आहे. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेल्या पारीमामीला देशमुख रखेल बनवतो आणि एक दिवस क्रुरपणे तिला पेटवून मारतो. तिचे घर उद्ध्वस्त होते. बेलदार हे चोर आहेत म्हणून त्यांना गुन्हेगार ठरविले जाते आणि पुरुषांबरोबर स्त्रियांनाही मारहाण केली जाते. पिढ्यान्पिढ्या व्यवस्थेकडून होणारा अत्याचार हा समाज सोसत आलेला आहे.

स्थितीशील वृत्ती :

आपण भिकारपंतातले आहोत याची सतत जाणीव या समाजाला आहे. प्राप्त परिस्थिती बदलावी, स्थायिक व्हावे, स्वतःमध्ये सुधारणा करावी, शिक्षण घ्यावे असे विचार या समाजामध्ये दिसत नाही. इच्छा असली तरी त्यांना त्यात अनेक अडचणीही दिसतात. सोयरिक जुळविण्यापासून काडीमोड घेण्यापर्यंत निर्णय घेण्याचा अधिकार जातपंचायतीच्या पुढाऱ्यांना असतो. त्यांनी दिलेला निर्णय हा अंतिम असतो. हा समाज जातपंचायतीच्या बाहेर जाऊन काही ठरवायला तयार नसतो. आणि जातपंचायतीने दिलेला निर्णय हा अतिशय निर्दयी असतो. सरीमामीला दिलेली शिक्षा तिचा बळी घेते. रकमीला खेम्याशी इच्छा नसताना काडीमोड घ्यावा लागतो. पांड्या हा शिकलेला मुलगा जातीबाहेर जाऊन विवाह करतो. जातपंचायतीला मात्र आंतरजातीय विवाह मान्य होण्यासारखा नसतो. त्यातून जातीबाहेर टाकण्याचा प्रसंग उद्भवला असता. या साऱ्या प्रकारात पांड्या आत्महत्या करतो. बायको पळून गेली, त्याची शिक्षा म्हणून झालेला आर्थिक दंड भरु शकत नाही, त्यामुळे भोयाला जातीबाहेर टाकल्याचा प्रसंग 'बिराड' मध्ये येतो. अशा प्रकारामुळे भोयाच्या मुलाबाळांचे विवाह होणे शक्य नसते. त्यातून मग शांतीला रखेली बनावे लागते. सरीमामीला जातीत राहता यावे यातून झालेल्या शिक्षेतून तिचा करुण मृत्यू होतो. जातपंचायतीमुळे आणि भटकेपणातून आलेल्या अस्थैर्यामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त होतात. नवससायास, दारु पिऊन गोंधळ घालणे, मारहाण करणे हा एक त्यांच्या जीवनाचा भाग झालेला दिसतो. काळानुरुप या भटक्या समाजाचे धंदे इतरही लोक करु लागले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर बिकट परिस्थिती आली आहे. मुंबईकडून, शहरावरून शिकून आलेल्या गवंड्यांकडून बांधकाम केले जायला लागल्यामुळे काम मिळण्यातही अडचणी येत राहतात. चोर म्हणून शिक्का बसल्यामुळे चोरी केली नसली तरी पोलिसांकडून मारहाण होऊ नये म्हणून गुन्हा कबूल करावा लागतो. मुलगा झाल्याचा आनंद गोट देऊन म्हणजे दारु आणि मटणाचे जेवण देऊन साजरा केला जातो. परंतु आपल्या मुलाबाळांच्या जीविताचे रक्षण परिस्थितीपुढे करता येत नाही. बंडूमामाचे तान्हे बाळ पाण्यात वाहून जाते, सरीमामीच्या पांड्याला वाघ फोडून खातो, सोजी उपचाराअभावी तडफडून मरते, डोंबाऱ्याची दोनतीन वर्षांची मुलगी खेळ दाखवताना पडून मरते. कोणाच्या ह्दयाला चटका लावणारे हे मृत्यू आहेत. मरण पावलापावलावर उभे आहे. बुंदीचे जेवण मिळावे म्हणून गेलेली बुढी अंगावर वीज पडून मरते. तिचे कलेवर पाण्यात वाहून जाते. साप डसून झालेले मृत्यू विचार करायला लावणारे आहेत. तीन दगडयांच्या सोबत्यांचे जीवन मात्र वर्षांनुवर्षे त्याच पध्दतीने चालू आहे.

आपले रीतीरिवाज, परंपरा यांना हा समाज चिकटून आहे. जातपंचायत, त्याचे पुढारी अनेकदा गैरफायदा घेतला जातो, जुलूम होतो. स्वतःची दहशत पुढारीनिर्माण करतात. सुधारणा त्यांनाही नको आहे. भुकेभोवती त्यांचे सारे जीवन दावणीला बांधलेले जाणवत राहते. झडीच्या दिवसात झाडपाला खाऊन जगावे, प्रसंगी मेलेले सडलेले जनावरही खाण्याची वेळ या लोकांवर आलेली दिसते. गावपंगत असेल तर एका कोपऱ्यात ताटकळत उभे असलेले हे लोक दिसतात. शिकून आत्मभान आलेले अशोक, संपतसारखे तरुण जातपंचायतीच्या नजरेत खुपतात. त्यांच्या स्थायिक होण्यात गाववालेही अडथळे आणतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे तरुण पिढी बदलू पाहते आहे. शिक्षणाचे, स्थैर्याचे महत्व त्यांना पटू लागले आहे परंतु त्यांच्यापुढे अनेक अडचणी आहेत. मरणाच्या दारात असलेला संपत म्हणतो, ''अशोक, आता मी ह्या दुखण्यातून वाचू शकत नाही. मी जरी मेलो तरी आपल्या समाजपरिवर्तनाचा लढा तू चालू ठेव. फुले, आंबेडकरांचे विचार जिवंत ठेव. तुह्यातला फुले, आंबेडकर मरु देऊ नको. मला वचन दे.''३परिघाच्या बाहेर असणारा हा समाज निवडणूकीच्या प्रचारादम्यान दाखवली जाणारी रामराज्याची स्वप्ने, त्यांच्याही कानावर येत राहतात. आपण मात्र भटके आहोत. स्थायिक झालो नाही, रहिवाश्याचा दाखला आपल्याजवळ नाही. त्यामुळे कागदोपत्री अजूनही या देशाचे आपण नागरिक नाही,

याची जाणीव नव्या पिढीला होऊ लागली आहे. या समाजाच्या स्थितीशील वृत्तीमुळे मुख्य प्रवाहापासून वर्षानुवर्षे हा समाज दूर राहिला आहे. प्रस्थापित व्यवस्थेने त्यांना कधी आपले मानले नाही. व्यवस्थेकडून त्यांच्यावर अत्याचार, अन्याय, शोषण होत राहिले. त्या भयानेही हा समाज चार हात दूरच राहत आला. परिस्थितीच्या हातचे बाहुले बनत राहिला.

समारोप :

अशोक पवार यांच्या 'बिराड' या आत्मकथनातून बेलदार या भटक्या समाजाचे जगणे जगासमोर आले आहे. त्यांच्या रीतीभाती, खानपान, सणवार यातून त्यांच्या जीवनाचे दर्शन घडते. अज्ञान, अंधश्रध्दा यामध्ये हा समाज गुरफटला आहे. भटक्या समाजातील पारधी, कैकाडी, वासुदेव, डोंबारी आदी जमातीं विषयी ओघाने वर्णन प्रस्तुत आत्मकथनातून येते. 'तीन दगडांचा सोबती' असलेला हा भटका समाज. बेलदार समाजापेक्षा वेगळी परिस्थिती या समाजाची नाही. भटकेपणामुळे आलेले अस्थैर्य, त्यातून वाट्याला आलेले दुःखभोग भोगण्यातच त्यांचे आयुष्य संपून गेलेले दिसते. जातपंचायतीचा क्रुर विळखा या समाजावर आहे. जातपंचायतीला, पुढाऱ्यांना हा समाज वचकून असतो. या पंचायतीने दिलेले निकाल अमानवी, गंभीर आहेत. प्रस्थापितांकडून, पोलिस यंत्रणेकडूनही या लोकांवर अन्याय होत राहतात. भूक, पोटाचा प्रश्न त्यांच्यासमोर असलेला सर्वात मोठा प्रश्न आहे. या भुकेसाठी त्यांना वणवण भटकावे लागते. या समाजातील स्त्रियांची स्थिती पशुतुल्य अशीच म्हणावी लागेल. नवससायास, कोंबडे, बकरे कापणे, व्यसनाधिनता यामध्ये हा समाज गुंतून पडला आहे. 'आपली जात भिकारी' असे स्वतःला स्वीकारल्यामुळे परिस्थितीत बदल करण्याची वृत्ती दिसत नाही. शिक्षणाचा गंध नाही, तरुण पिढीला शिक्षण घेण्यात अनेक अडचणी आहेत. भटकेपणामुळे नागरिकत्वही त्यांना मिळाले नाही. बाहेर जसे यांचे शोषण होते तसेच अंतर्गत व्यवस्थेकडूनही त्यांचे शोषण होत राहतें. चोर, गुन्हेगार ही ओळख घेऊन लपतछपत त्यांना जगावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे तरुण पिढीमध्ये परिवर्तनाचे चैतन्य दिसत असले, तरी अनेक समस्या त्यांच्यासमोर आहेत. अंतर्गत आणि बाह्य अनेक अडचणींशी त्यांना सामना करायचा आहे. स्थाईक होण्यातून अनेक प्रश्न सुटणार आहेत परंतु प्रतिकूल परिस्थितीशी सतत दोन हात करावे लागतात. दारिद्र्याशी झगडता झगडता भटकेपण सोबत घेऊन हिंडावे लागते. भटक्या जमातीचे वास्तव चित्रण 'बिराड' या आत्मकथनातून अनुभवाला येते.

संदर्भ टिपा :

१.अशोक पवार, बिराड, पुणे, चौथी आवृत्ती २०१०, पृ.क्र. ३३
२.तत्रैव, पृ.क्र. ५३
३.तत्रैव, पृ.क्र. १७७

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org